# दिनांक 12/04/2025

**1.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 09:00 वा च्या सुमारास मौजे फिर्यादी यांचे घराचे समोर तळवली पो खंडाळे ता.अलिबाग, येथे फिर्यादी रा. तळवली पो खंडाळे ता.अलिबाग हे त्यांच्या घराचे अंगणात बोरींग मारुन घेण्याचे काम करत असताना आरोपीत क्र.1 रा. तळवली पो.खंडाळे हे फिर्यादी यांना म्हणाले की बोरींग येथे मारायची नाही येथुन रस्ता आहे असे बोलुन फिर्यादी यांच्या घरातील सर्व लोकांना शिवीगाळी करुन दमदाटी करत असताना तेथे आरोपी क्र.2,3 व 3 यांनी येवुन संगनमत करुन फिर्यादी यांच्या घरातील लोकांना शिविगाळी करुन हाताबुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्र.1 यांनी फिर्यादी यांना धक्काबुक्की करत असताना तेथे पडलेली वीट उचलुन फिर्यादी यांचे जावई यांचे कपाळावर मारुन दुखापत केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.63/2025, भारतीय न्याय संहिता 2023 सजे कलम 118(1), 115(2),351(2),351(3),352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पाटील हे करीत आहेत.

**2.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 23:30 वा ते दि. 11/04/2025 रोजी 23:30 वा च्या दरम्यान मौज शिवानी रेसीडेंसी,श्लॅट क्र 303, मुद्रे बुद्रूक, ता.कर्जत येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे राहत्या श्लॅटचा लोखंडी दरवाजाची कडी कोयंडा व लॉक तोडून त्यावाटे आत प्रवेश करून फिर्यादी यांचे संमतीशिवा,लबाडीच्या उददेशाने,स्वत:च्या फायदया करीता एकूण 20,9000/- रुपये व किंमतीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.100/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 305(a), 331(3),331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री.धबडे हे करीत आहेत.

**3.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 08:30 वा च्या सुमारास मौजे तळवली पो खंडाळे ता.अलिबाग येथे आरोपी क्र.1 हे बोरिंग मारत असताना त्याची धुळ फिर्यादी यांच्या घरामध्ये येत असल्याने फिर्यादि हे त्यांना विचारण्यास गेले असता त्या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपी क्र.1 ते 5 सर्व रा.तळवली पो.खंडाळे असे सर्व फिर्यादी यांच्या अंगावर मारण्यास येवुन त्यांनी फिर्यादी यांना हाताबुक्क्याने मारहाण केली व आरोपी क्र.5 यांनी फिर्यादीच्या छातीवर बसुन फाईट मारल्या व आरोपी क्र. 3 याने फिर्यादी यांना फाईट मारली मारहाण

सोडविण्या करीता फिर्यादी यांची पत्नी व दोन मुल आले असता आरोपी क्र.1 ते 5 यांनी फिर्यादी यांच्या पत्नी व दोन मुलांना देखील हाताबुक्क्यांनी मारहाण केली. धमकी दिली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.64/2025, भारतीय न्याय संहिता 2023 189(2),191(2),190,115(2),351(2),351(3),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पाटील हे करीत आहेत.

**4.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/04/2025 रोजी 11:59 वा च्या सुमारास मौजे कृषी उत्पन्न बाजार समिती पेण ता.पेण येथे लोकसेवक, (वर्ग-3), यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करुन फिर्यादी यांचे आशिल यांच्या घराचा असेसमेंट उतारा देण्याचे कामाकरीता स्वतःचे फायदयाकरीता रु 5000/- लाचेच्या रक्कमेची माणगी करुन सदर मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक वेळ: 11/04/2025 रोजी 23:51 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 69/2025लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, 1988, इतर विभाग, लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, 1988 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलिस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नवी मुबई- अरुधंती येळवे ह्या करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 11.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 24 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 32,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.